तरंगाची झाली लहर

लहरीची झाली लाट

समुद्र काही सोडेना

सोनेरी किनाऱ्याची पाठ



हवेची झाली झुकून

झुळुकेचा झोत

झोताचा झाला वारा

नाही सोडला  किनारा

पार दूर क्षितिजापर्यंत

ढगांच्या आकाशात

उधळण विविध रंगांची

मनी नाचे आनंदी शांति